देशदूत
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.
नाशिक । मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५

संमिश्र

देशातील सर्वोच्च पद्म पुरस्कार काल ७१ जणांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.त्यात गायिका जसपिंदर नरूला, मारूती चित्तमपल्ली, धुळे जिल्ह्यातील बारीपाड्याचे पर्यावरण संवर्धक चैत्राम पवार, चित्रकार वासुदेव कामथ,पं. रानेंद्र भानू- मजुमदार, डॉ. पवन कुमार गोएंका,अभिनेता शेखर कपूर,अरुंधति भट्टाचार्य, पंकज उदास (मरणोत्तर) आदींचा समावेश होता.

गुंतवणुकीसाठी सोने सर्वात स्थिर, उत्तम पर्याय

देशदूत संवाद कट्ट्यात सराफ व्यावसायिकांचे मत

नाशिक । गेल्या वर्षभराचा विचार केला तर सोन्याच्या दरात दिवसागणिक मोठी वाढ होत असल्याचे पहावयास मिळत आहे. वाढत्या दरामुळे, गुंतवणूकदारांना बँकेच्या व्याजदरापेक्षा सोन्याच्या दरात मोठा परतावा मिळत असल्याचे दिसून आले आहे. सोन्याच्या दरात मागील काही वर्षांत झपाट्याने वाढ झाली आहे. दरात होणारी वाढ व अन्य गोष्टी लक्षात घेता सोने हा गुंतवणुकीसाठी अत्यंत स्थिर व उत्तम पर्याय असल्याचे मत नाशिकच्या सराफ व्यावसायिकांनी देशदूतच्या विशेष संवाद कट्ट्यात व्यक्त केले.

नुकतेच सोन्याच्या किमतीने एक लाख रुपये प्रति तोळा असा टप्पा गाठला होता. त्याचप्रमाणे उद्या (दि. ३०) साजऱ्या होणाऱ्या अक्षयतृतीया सणाच्या पार्श्वभूमीवर दैनिक 'देशदूत'च्या संपादक डॉ. वैशाली बालाजीवाले यांनी मयूर अलंकारचे संचालक मयूर शहाणे, टकले ज्वेलर्सचे संचालक शुभंकर टकले आणि न्यू श्रीनिवास ज्वेलर्सचे संचालक शुभम चोपडा यांच्याशी सविस्तर चर्चा केली. मयूर शहाणे म्हणाले, साडेतीन मुहूर्तांपैकी एक म्हणून अक्षय तृतीयेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच या दिवशी खरेदी केलेले सोने पवित्र मानले जाते. या दिवशी सामान्य माणूसदेखील किमान गुंजभर सोने खरेदी करतोच. ज्यांना सोने शक्य नाही, असे लोक चांदी खरेदी करतात. अक्षयतृतीया आणि हे वर्षानुवर्षांचे समीकरण बनलेले आहे. मुळातच, सोने खरेदी हे भारतीयांच्या जिव्हाळाचा विषय आहे. सध्या सोन्याच्या भावात तेजी असूनही ग्राहकांमध्ये चैतन्याचे वातावरण आहे. कारण ग्राहकांकडे आधी असलेल्या सोन्याची देखील किंमत वाढली आहे.

आपत्कालीन परिस्थिती असो किंवा घर खरेदी जमीन खरेदी अथवा अन्य गोष्टी खरेदीसाठी तत्काळ पैसे उपलब्ध करून देणारा एकमेव पर्याय हाच सोने असतो, हे ग्राहकांनी हेरले आहे. त्यामुळे ग्राहकांनी नक्कीच सोन्यामध्ये कोणत्याही प्रमाणात का होईना गुंतवणूक केली पाहिजे. आपल्या बजेटनुसार ग्राहकांनी सोने खरेदी करावे. कोणत्याही देशात युद्धजन्य परिस्थिती झाल्यास त्याचा निश्चित परिणाम सोन्याच्या किमतीवर होत असतो. सोन्याच्या किमती या नेहमी वधारतच राहतील, यात कोणतीही शंका नाही. सोन्यात गुंतवणूक करून अधिक परतावा मिळवण्यासाठी ग्राहक हा नेहमी चोख सोने खरेदी करत असतो. त्याचप्रमाणे हौसेसाठी ग्राहक दागिने खरेदी करण्यासाठी भर देतात. काही दिवसांपूर्वी समाज माध्यमांवर सोन्याचे दर कमी होणार अशी अफवा पसरल्याने अनेकांनी त्यांच्या जवळचे सोने अधिकाऱ्यांसाठी विक्री केले. मात्र, त्यात काही तथ्य नव्हते. त्यानंतर सोन्याचे भाव वाढतच गेले. सोन्याचे भाव आतापर्यंत कधीही कमी झाले नाहीत आणि भविष्यात देखील कमी होणार नाही, ते वाढतच राहतील. येत्या काळात १ लाख, १० हजार रुपयांपर्यंत सोन्याची दर जाऊ शकतात. त्यामुळे प्रत्येकाने सोन्यामध्ये अल्प प्रमाणात का होईना गुंतवणूक केलीच पाहिजे, असे मत मयूर अलंकारचे संचालक मयूर शहाणे यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे 'डिजिटल गोल्ड' ही संकल्पना आज बरीच लोकप्रिय होतांना दिसत आहे. यात २४ तास आपण सोने खरेदी, विक्री त्याचप्रमाणे एखाद्याला गिफ्ट करू शकतो, किंवा सोने रिडिम देखील करू शकतो. डिजिटल गोल्ड असा प्लॅटफॉर्म आहे जेथे अगदी १० रुपयांपासून तर जेवढी क्षमता असेल तेवढे सोने आपण खरेदी करू शकतो. असे करत असताना थोडे थोडे करून जे सोने खरेदी केलेले असते ते सोने एखाद्या सराफी पेढीत जाऊन आपण फिजिकली रिडिम करू शकतो.

आपत्कालीन परिस्थितीत नक्कीच सोने हे आपल्या पाठीशी असते. सोन्याचा पुरवठा कमी असला तरी, मागणी ही वाढत जाणारी आहे. तसेच, त्याची किंमत देखील वाढत जाणारी आहे. गुंतवणुकीसाठी अत्यंत स्थिर पर्याय म्हणून सोन्याकडे बघितले जाते. सोने गुंतवणुकीमध्ये स्थैर्य आणि उत्तम परतावा आणि वाढ दिसून येतो. विविध देशांमधून आपल्या देशात जेव्हा सोने येते, त्यावर आयात शुल्क लागू होते. यानंतर ते व्यापाऱ्यांकडे येते. यानंतर अनेक टप्प्यांतून सोन्याचे विविध दागिने बनून ग्राहकांपर्यंत येते. सोन्याचे दागिने प्रत्यक्षपणे तयार होण्यामागे मोठी प्रक्रिया असते आणि यानुसार त्याचे दर हे अल्प प्रमाणात कमी अधिक असू शकतात. त्याचप्रमाणे घडणावळीचे निकष निश्चित नसतात. कलाकार किती सुबकपणे दागिने घडवतो, यावर हे अवलंबून असते. अत्यंत कलाकुसरीने सुंदर दागिने बनवणाऱ्या कारागिराचा मोबदला अधिक असतो. त्यावर प्रत्येक सराफी पेढीचे घडणावळीचे दर ठरतात. बरीच लोक सोन्याव्यतिरिक्त चांदीमध्यही गुंतवणूक करण्यास इच्छुक असतात किंबहुना ते करतात. चांदीच्या भावामध्ये चढ-उतार होऊ शकतात. चांदीचे भाव कमी झाल्याचे इतिहासात नोंद असल्याचे शुभंकर टकले म्हणाले.

जगात सोन्याचे महत्त्व लोकांना समजले आहे. सोन्यामुळे माणसाला आर्थिक स्थैर्य मिळते. सोने ही अशी गुंतवणूक आहे की, यामुळे हौस करता येते आणि त्याची किंमतही वाढते. सोन्याची गुणवत्ता तपासण्यासाठी अनेक अत्याधुनिक उपकरणे सध्या सर्वच ठिकाणी असतात. जेवढे पारदर्शकपणे व्यापारी हा त्याचे काम करत असतो तेवढ्याच प्रमाणात आहे ग्राहकांचा त्याच्यावर विश्वास बसतो. चांदीमध्ये अनेक लोक गुंतवणूक करतात. खास करून चांदीच्या भांड्यांमध्ये गुंतवणूक करणे यामागे दोन कारणे आहेत. एक म्हणजे ते प्रतिष्ठेची मानले जाते. आणि दुसरे कारण हे वैज्ञानिक कारण आहे. चांदीच्या भांड्यामध्ये जेवण करणे आरोग्यदायी असल्याची नोंद अनेक ठिकाणी आढळते. सोन्याप्रमाणे चांदी देखील भविष्यात नक्कीच उत्तम परतावा देणार यात काही शंका नाही. एकूणच काय तर सोने आणि चांदी यामध्ये गुंतवणूक ही अत्यंत फायदेशीर आहे. त्यामुळे सनाला गुंतवणूक म्हणून आणि हौस म्हणूनही लोक सोने खरेदीसाठी सराफी पेढ्यांमध्ये वळतील असा विश्वास सराफ व्यावसायिकांनी संवाद कट्ट्यात व्यक्त केला.

नेचर क्लबच्या बर्ड सर्वेत दिसला 'चायनीज पाँड हेरॉन'

नाशिक । नेचर क्लब ऑफ नाशिकच्या वतीने महाराष्ट्रातील पहिल्या रामसर दर्जा मिळालेल्या नांदूरमध्यमेश्वर वन्यजीव अभयारण्यमध्ये प्रथमच पक्ष्यांच्या परतीच्या स्थलांतरित मार्गावर बर्ड सर्वेचे आयोजन करण्यात आले. यावेळी नाशिकमधील चाळीस पक्षी मित्रांनी सहभाग घेतला. 'चायनीज पाँड हेरॉन' या पक्ष्याचे महाराष्ट्रात प्रथमच दर्शन झाले आहे. हा पक्षी साधारणपणे ४७ सें.मी. (१९ इंच) लांब असतो, त्याचे पंख पांढरे असतात, टोक काळे असते, डोळे आणि पाय पिवळे असतात. प्रजनन काळात त्याचा एकूण रंग लाल, निळा आणि पांढरा असतो आणि इतर वेळी राखाडी-तपकिरी असतो आणि त्यावर पांढऱ्या रंगाचे ठिपके असतात. नुकताच पक्षी अभयारण्यात नेचर ट्रेल घेत बर्ड सर्वे घेण्यात आला. यावेळी पक्षी अभयारण्यात दहा हजार पक्ष्यांची नोंद करण्यात आली. सहायक वन संरक्षक हेमंत उबाळे यांनी पक्षीमित्रांना मार्गदर्शन केले. ग्रेटर पेंटेड स्नाईप,ट्री पीपीट,एलो बिटर्न,या पक्ष्यांसह ग्रे हेरॉन,पेंटेड स्टोर्क ,किंगफिशर,रोझी स्टारलिंग,आदी पक्षी देखील बघावयास मिळत असून

जाकाना,पर्पल मूरहेन आणि कूट या पक्ष्यांची पिले चक्क पावसाळ्या पूर्वी बघावयास मिळाली. सहायक वनसंरक्षक हेमंत उबाळे यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष प्रा.आनंद बोरा, थायलंडमधून आलेल्या पो मॅम,प्रभारी वनपाल संदीप काळे,वन रक्षक आशा वानखेडे,डॉ.अनिल माळी,दर्शन घुगे,रवींद्र वामनाचार्य,डॉ.जयंत फुलकर,नितेश पिंगळे,भीमराव राजोळे,अमोल दराडे,अमोल डोंगरे,नितेश पिंगळे,शंकर लोखंडे,गंगाधर आघाव,विकास गारे,प्रमोद दराडे,रोहित मोगल,किरण बेलेकर,गणेश वाघ,केशव नाईकवाडे,मंजुषा पत्की,मिलिंद पत्की,अनंत सरोदे,उमेशकुमार नगरे,कीर्ती मारू,मनोज वाघमारे,नुरी मर्चंट,नितीन कोकणे,संदीप सोनवणे,राजू ठाकरे,ओमकार भावनाथ,नेहा कडलग,सुनील जाधव,प्रमोद मोगल आदींसह पक्षिमित्र,गाईड सहभागी झाले होते.

आजचे कार्यक्रम

श्री भगवान परशुराम जन्मोत्सव
सकाळी ८ वा.
भगवान परशुराम चौक,
इंदिरानगर

स्व. मधुकर आण्णा झेंडे यांच्याप्रति शोकसभा
सायकाळी ५.३० वाजता
मु. शं. औरंगाबादकर सभागृह

डॉ. हासे हॉस्पिटल ॲण्ड मॅटर्निटी होम नागरिकांच्या सेवेत

नाशिक । अक्षय्यतृतीयेच्या शुभमुहूर्तावर अत्याधुनिक सोयी सुविधायुक्त असलेल्या व आयुष उपचारासाठी कॅशलेश मेडिक्लेम सेवा देणाऱ्या पहिल्या वहिल्या मॅटर्निटी, आयुर्वेदा, कायरोप्रक्टीक सुविधा उपलब्ध असलेल्या डॉ. हासे हॉस्पिटल ॲण्ड मॅटर्निटी होमचा भव्य शुभारंभ गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते होणार असल्याचे माहिती डॉ. संदीप हासे यांनी दिली. डॉ. संदीप हासे आणि डॉ. प्राजक्ता हासे यांच्या अथक परिश्रम आणि सेवाभावी कार्याने सीटू भवन शेजारी खुटवडनगर, येथे उभ्या राहिलेल्या डॉ.हासे हॉस्पिटल ॲण्ड मॅटर्निटी होमच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ना. नरहरी झिरवाळ ,माजीमंत्री डॉ. भारती पवार , बाळासाहेब थोरात , खासदार राजाभाऊ वाजे , आमदार सीमा हिरे, देवयानी फरांदे ,डॉ राहुल

आहेर, अमोल खताळ ,माजी खासदार हेमंत गोडसे, शिवसेना उपनेते सुधाकर बडगुजर , शिवसेना जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, माजी सभागृह नेते दिनकर पाटील , माजी नगरसेविका सुवर्णा मटाले, हर्षा गायकर , डॉ शैलेश निकम , डॉ तुषार सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत .बुधवार, ३० एप्रिल रोजीसायंकाळी ५ वाजता होणाऱ्या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन हासे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे .

पतंजली, वीर माधो सिंग भंडारी विद्यापीठात करार

हरिद्वार । शैक्षणिक आणि संशोधन सहकार्याला चालना देण्यासाठी पतंजली विद्यापीठ, हरिद्वार आणि वीर माधो सिंग भंडारी उत्तराखंड तांत्रिक विद्यापीठ, डेहराडून यांच्यात नुकत्याच एका महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.यावेळी पतंजली विद्यापीठाचे कुलगुरू आचार्य बाळकृष्ण आणि उत्तराखंड टेक्निकल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा.ओमकार सिंग यांनी

करारावर स्वाक्षरी करताना विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी तयार करण्यात ही भागीदारी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त केला. या करारांतर्गत योग विज्ञान, आयुर्वेद, निसर्गोपचार, संलग्न आणि उपयोजित विज्ञान आणि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान यांच्या एकत्रीकरणाद्वारे कृषीसह विविध क्षेत्रात संयुक्त प्रशिक्षण, संशोधन आणि विकासाला चालना दिली जाईल. या करारांतर्गत, शैक्षणिक, संशोधन आणि विकास उपक्रमांमध्ये सहकार्य, कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आणि तांत्रिक नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे यावर भर दिला जाईल. याशिवाय, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समाजातील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठीही प्रयत्न केले जातील.या द्विपक्षीय करारांतर्गत, दोन्ही विद्यापीठे संयुक्तपणे प्रमाणपत्र अभ्यासक्रम, अल्पकालीन आणि दीर्घकालीन अभ्यासक्रम, संयुक्त संशोधन आणि प्रकाशन कार्य, तज्ज्ञांचा सल्ला, संयुक्त कार्यशाळा, समकालीन विषयांवर चर्चासत्रे आणि परिषदा आयोजित करतील. याशिवाय संयुक्त अभ्यासक्रमांचे आयोजन, अभ्यास साहित्याची देवाणघेवाण, रुग्णालय व्यवस्थापनाशी संबंधित कार्यक्रम, विशिष्ट विषयांवर संशोधन आणि अहवालांचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. यावेळी पतंजली विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.मयांक कुमार अग्रवाल, परीक्षा नियंत्रक प्रा.अरविंद कुमार सिंग आणि उत्तराखंड तांत्रिक विद्यापीठाचे कुलसचिव, परीक्षा नियंत्रक डॉ.व्ही.के.पटेल आणि वित्त नियंत्रक विक्रम सिंह उपस्थित होते.

चंदुकाका सराफ दालनात दागिन्यांवर ऑफर दुचाकी जिंकण्याची संधी

नाशिक । अक्षय्यतृतीयेच्या शुभमुहुर्तावर चंदुकाका सराफ दालनामध्ये सोने खरेदी करणे ग्राहकांना लाभदायक ठरणार आहे. उद्या (दि.३०) सणानिमित्ताने ३० हजार रुपये व पुढील खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ज्युपिटर दुचाकी जिकण्याची संधी चंदुकाका सराफाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, सोने दागिन्यांवरही २,५०० रुपये प्रति १० ग्रॅमपर्यंत खास सूट देण्यात आली आहे.सोने दागिने खरेदीवर ग्राहकांना किमान रुपये १०० प्रति ग्रॅम तर हिरे दागिन्याच्या घडणावळीवर १००% टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येणार आहे. सोन्याच्या जुन्या दागिन्यांवर शून्य टक्के घट असेल. चंदुकाका सराफ यांच्या सर्व स्टोअर्समध्ये हे लाभ ग्राहकांना घेता येतील. तसेच प्रत्येक स्टोअरमध्ये १ व बारामती स्टोअरमध्ये २ ज्युपिटर जिंकण्याची संधी मिळणार आहे. या

ऑफर्स केवळ अक्षय्यतृतीयेच्या दिवशीच (दि.३०) लागू राहणार आहेत. तेव्हा शुभमुहूर्ताच्या दागिने खरेदीसाठी आणि दुचाकी जिंकण्यासाठी आपल्या जवळच्या चंदुकाका सराफ स्टोअरला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन किशोरकुमार शहा व सम्यक शहा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

तीव्र पाणीटंचाई : इगतपुरीतील धरणांनी गाठला तळ

पाच वर्षात पहिल्यांदाच जलसाठ्यात मोठी घट

घोटी । जाकीर शेख

इगतपुरी तालुक्यात सात मोठी धरणे आहेत. मात्र, यावर्षी उन्हाची तीव्रता आणि पावसाचे प्रमाण कमी या दोन्ही समीकरणाने तालुक्यातील सात धरणांनी अक्षरशः तळ गाठला आहे. त्यामुळे जून महिन्यात पाऊस पडला नाही तर दुष्काळाला सामोरे जावे लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.

सात मोठे जलप्रकल्प असलेल्या इगतपुरी तालुक्यात उन्हाळ्याच्या अखेरच्या टप्प्यात १५ टँकरद्वारे एकूण १६ गावे व ४८ वाड्यांना पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. धरणांच्या तालुक्यातच वाड्यापाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. कुठे गेल्या शासनाच्या जलजीवन योजना आणि कधी येणार नळाद्वारे घरापर्यंत पाणी असा सवाल आदिवासी वाड्यापाड्यातील महिला वर्गांकडून व्यक्त होत आहे. हर घर नल का जल हीच का सरकारची जलजीवन मिशन सफल झाली का? असा प्रश्न ग्रामीण भागातील महिलांकडून उपस्थित केला जात आहे. इगतपुरी तालुक्यातील भावली, भाम, दारणा, कडवा व वाकी या धरणांमध्ये ३० टक्के पाणीसाठा असून धरणालगतच्या गावांनाच पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. धरणातील जलसाठा संपुष्टात आला असून, आता मृत जलसाठ्यावर येथील नागरिकांची मदार आहे. तर भावली धरणात अवघा ३५ टक्के साठा शिल्लक राहिल्याने गावांची चिंता वाढण्याची शक्यता आहे. धरणालगतच्या असलेल्या वाड्या पाड्यांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. धरणात पाणी दिसत असतानाही टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.भाम धरणालगत असलेल्या मांजरगावच्या दोन वाड्या भरवज, निरपनची वाडी, काळूस्तेची देवाडी,त्रिंगलवाडीचा बंधारा रिकामा झाल्याने त्रिंगलवाडीसह पाच वाड्यांना,तसेच वाकी धरणालगत वाळविहीर परिसरातील सहा वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा

लागत आहे.याबरोबरच खैरगावच्या दोन वाड्या, शेवगेडांग दोन वाड्या, कुरुंगवाडीची एक वाडी, आंबेवाडीच्या दोन वाड्या, बलायदुरी , वासाळीची एक वाडी, आवळखेड, बळवंतवाडी गरुडेश्वरच्या चार वाड्या, मायदरासह दोन वाड्या, खेडच्या दहा वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

जिल्ह्यात १५९ टँकरफेऱ्या; येवला तालुक्यात सर्वाधिक टंचाई

नाशिक । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात पाणीटंचाईच्या झळा तीव्र झाल्या आहेत. जिल्ह्यातील दहा तालुक्यात पाणीटंचाई जाणवत असल्याने प्रशासनाकडून मागणीनुसार टँकर सुरू करण्यात येत आहेत. गेल्या महिनाभरात दिवसेंदिवस पाणीटंचाई वाढत असल्याने जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ७८ टँकरच्या माध्यमातून ८१ गावे व १७० वाड्यांना १५९ टँकर फेऱ्यांद्वारे १ लाख ४९ हजार ५६३ लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील धरण समूहात ३३.६२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तर नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरण समूहात ४८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.येवला तालुक्यातील ३१ गांवे व ४१ वाड्यांसाठी २९ टँकरच्या माध्यमातून ५१ टँकर फेऱ्याद्वारे नागरिकांची तहान भागवली जात आहे.

दरम्यान,जिल्ह्यात प्रशासनाकडून ४४ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. १० विहिरींचे अधिग्रहण गावांसाठी तर ३४ विहिरींचे अधिग्रहण टँकरसाठी करण्यात आले आहे.

पोलीस महासंचालक पदक जाहीर

(पान १ वरुन) प्रशांत बच्छाव, परिमंडळ दोनच्या उपायुक्त मोनिका राऊत यांच्यासह चार वरिष्ठ पोलीस निरीक्षकांसह आयुक्तालयातील २९ तर, नाशिक ग्रामीणमधील १७ अधिकारी-अंमलदारांना राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी ही पदके जाहीर केली आहेत. पोलीस उपमहानिरीक्षक, सहआयुक्त, पोलीस अधीक्षक ते अंमलदार प्रवर्गापर्यंत राज्यातील एकूण ८०० पोलिसांना हे सन्मानचिन्ह जाहीर केले. यात वरील अधिकाऱ्यांसह नाशिक पोलीस आयुक्तालयातील विशेष शाखेचे वरिष्ठ निरीक्षक युवराज पत्की, म्हसरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अंकुश चिंतामण, चुंचाळे चौकीचे पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे, सातपूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रणजित नलवडे यांचाही समावेश आहे.

गिरीश महाजनांना हायकोर्टाचा दिलासा

(पान १ वरुन) काढली. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने या प्रकरणात सीबीआयने २०२३ मध्येच क्लोजर रिपोर्ट दाखल केला असल्याने याचिकाकर्त्याने ट्रायल कोर्टासमोर दाद मागावी, असे निर्देश देत याचिका निकाली काढली. जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज या शैक्षणिक संस्थेचे संचालक विजय भास्करराव पाटील यांनी ही याचिका दाखल केली होती.२०२० मध्ये गिरीश महाजन व इतर २८ जणांविरुद्ध कबुलीजबाब मिळविण्यासाठी गंभीर दुखापत करणे, अपहरण, खंडणी, चोरी, गुन्हेगारी अतिक्रमण तसेच भारतीय दंड संहिता व मोक्का कायद्याच्या इतर कलमांखाली गुन्हा नोंदवला होता. त्या गुन्ह्याशी संबंधित खटल्यामध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. महाजन यांनी शैक्षणिक संस्था विकण्यास भाग पाडल्याचा आरोप पाटील यांनी २०२० मधील तक्रारीत केला होता. याप्रकरणी सुरुवातीला जळगावमधील निंभोरा पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला होता. नंतर त्या गुन्ह्याचा तपास पुण्यातील कोथरूड पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आला. त्या ठिकाणी खंडणी, अपहरण, चोरी आदी घटना घडल्याचा आरोप पाटील यांनी केला होता.

नाशकात धावणार निओ ऐवजी कॉम्पॅक्ट मेट्रो

(पान १ वरुन) काही नवीन मार्ग देखील कॉम्पॅक्ट मेट्रो प्रकल्पात सामील होणार आहे. ३ मार्च २०२५ रोजी राज्याच्या मुख्य सचिवांसह रेल्वे अधिकाऱ्यांची व्हिडिओ मिटींग झाली होती. त्यात नाशिकचे विभागीय महसूल आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, मनपा आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, मनपा वाहतूक सेलचे प्रमुख रविंद्र बागुल आदी अधिकारी सहभागी झाले होते. राज्याच्या अर्थसंकल्पात नाशिकच्या निओ मेट्रो प्रकल्पाची घोषणा देखील करण्यात आली होती. मात्र, आता ती कॉम्पॅक्ट मेट्रोच्या रुपाने नाशिकला मिळणार आहे. दरम्यान,निओ ऐवजी कॉम्पॅक्ट मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी होणार असल्याने नव्याने आराखडा पाठविण्याचे आदेश देण्यात आले होते. तर आता प्रत्यक्ष पाहणीला देखील सुरूवात झाली आहे. त्यात सुरूवातीपासून शेवटपर्यंत येणाऱ्या ठिकाणांची पाहणी करुन गती व विलंब, घरोघरी जाऊन सर्वेक्षण, वाहतूक मोजणी, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षणासह जंक्शन कुठे योग्य राहणार तसेच प्रदूषणबाबत सर्वेक्षण होत आहे. त्याच प्रमाणे सामान्य नागरिकांसह बस, रेल्वेस्थानक परिसरात जाऊन लोकांची मते जाणून घेण्यात येत आहेत.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक - ✻ **डॉ. वैशाली बालाजीवाले** ✆ : शहर- २५७५७१६, २५७२४००, फॅक्स - २५७०९३८. ● नाशिकरोड कार्यालय - २९४२२०३, ● मालेगाव कार्यालय फोन व फॅक्स - ०२५५४-२९९२०३, ● सिन्नर फोन व फॅक्स -०२५५१ - २९९२०३, ● दिंडोरी फोन व फॅक्स - ०२५५७-२२२८८८, ● निफाड फोन व फॅक्स - ०२५५७-२९९६९६. (✻ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ● Mail id : newseditnsk@deshdoot.com